# मे. दिवाणी न्यायधिश साहेब ('क' स्तर) न्यायालय, अंबाजोगाई
## ता.अंबाजोगाई जि.बीड

रे.दि.दा नं. /2026

वादी :– नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे,

Exh-7/D

विरुध्द

प्रतिवादी :– 1. गोविंदराव पिता नामाजी नागरगोजे व ईतर

दावा :– सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत

## शपथपत्र

मी, नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे, वय 52 वर्षे, धंदा शेती, रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड ह.मु. रा.उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी येथील रहिवाशी असून प्रतिज्ञेवर सत्यनिवेदन करतो की,

1. हे की, प्रस्तुत प्रकरणातील वादी व प्रतिवादी हे एकत्रित हिंदु कुंटुबाचे घटक असून वादी व प्रतिवादी क्र. 3 हे आपसात सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र. 1 व 2 हे त्यांचे आई वडील आहेत. प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचा दुसरा मुलगा नामे मनोहर गोविंदराव नागरगोजे याचे निधन झालेले आहे.

2. हे की, मौ. वरवटी ता.अंबाजोगाई जि.बीड शिवारातील वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांच्या एकत्रित कुंटुबाची वडीलोपार्जित शेत जमिन मिळकती खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | सर्व्हे नं. /गट नं. | क्षेत्र | टाकार | कोणाच्या नावे आहे |
|---|---|---|---|---|
| 1 | 400 | 00 हे. 52 आर | 00 रु. 70 पै | प्रतिवादी क्र. 2 |
| 2 | 183 | 00 हे. 54 आर | 00 रु. 25 पै | प्रतिवादी क्र. 2 |
| | एकुण | 01 हे. 06 आर | 00 रु. 95 पै | |

वर नमुद मिळकतीस यापुढे दाव्यात "वादग्रस्त मिळकत" असे संबोधण्यात येते

3. हे की, वाद दाव्यातील वादग्रस्त मिळकतीवर वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 5 यांचा एकत्रित कुंटुबाचा संयुक्तिक ताबा असून वादग्रस्त मिळकत ही एकत्रित कुंटुबाची वडीलोपार्जित मिळकत असून सदरील मिळकतीबाबत

नि.अ. नवनाथराव

2.2.26

अद्यापपावेतो वादी व प्रतिवादी यांच्यात कसल्याही प्रकारच्या वाटण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे वादीने दिनांक 25/01/2026 रोजी प्रतिवादीनां वादग्रस्त मिळकतीच्या सरसनिरस मानाने वाटण्या करुन स्वंतत्र ताबा मागितला असता प्रतिवादीनीं त्यास स्पष्ट नकार देवुन वादीनां वादग्रस्त मिळकतीतुन बेदखल करण्याची व वादग्रस्त मिळकतीच्या 7/12 व महसुली अभिलेखात प्रतिवादीं क्र. 1 यांची नावे असल्याचा गैरफायदा घेवुन वादग्रस्त जमिन गट नं. 400 मधील जमिन इतरांस विक्री करण्याची धमकी दिली तसेच आमच्या नावे असलेली सर्व वादग्रस्त मिळकत आम्ही विकुन टाकणार आहोत तुम्हांला काय ते कर असे स्पष्टपणे सांगितले. करीता वादीस प्रतिवादीं विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कारण हे दिनांक 25/01/2026 रोजी घडले आहे. सबब हे शपथपत्र.

दिनांक :– 2/02/2026
स्थळ :– अंबाजोगाई

प्रतिज्ञक
नि.अ. नाथराव
नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे,
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड
ह.मु. रा.उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

## सत्यापन

प्रस्तुतच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर आम्ही समजुन उमजनु तसदिका केल्या आहेत

दिनांक :– 2/02/2026
स्थळ :– अंबाजोगाई

प्रतिज्ञक
नि.अ. नाथराव
नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे,
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड
ह.मु. रा.उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

मी प्रतिज्ञकास ओळखतो

ॲड. व्हि.डी.शिंदे (चनईकर)
ॲड. व्हि.बी.भुरे
अंबाजोगाई
ॲड. आर.एम.रोडे

दिनांक 2/2/26
शपथेवर खरे सांगतो/सांगते की,
माझे नांव नाथराव गोविंदराव नागरगोजे वय 52 वर्षे धंदा शेती रा. वरवटी ता. अंबाजोगाई ह.मु उखळी (खु) ता. गंगाखेड
माझे समक्ष ...
ॲड. आर.एम. रोडे
त्यांना मी वैयक्तिक ओळखतात

2-2-26

सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर, अंबाजोगाई